भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१

(१९७१ चा अधिनियम क्रमांक ६९)

[ १ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Prevention of Insults to National Honour Act, 1971

## (Act No. 69 of 1971)

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९८१

[ किंमत—२० पैसे ]

# राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. भारतीय राष्ट्रध्वज व भारताचे संविधान यांचा अवमान.

३. भारतीय राष्ट्रगीत गाणे, इत्यादींस प्रतिबंध.

एच ४४०६ (५३०—२-८१)

# राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१

## (१९७१ चा अधिनियम क्रमांक ६९)

[२३ डिसेंबर, १९७१]

**राष्ट्र प्रतिष्ठेच्या अपमानास प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या बाविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

१. (१) या अधिनियमास 'राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

**भारतीय राष्ट्रध्वज व भारताचे संविधान यांचा अवमान.**

२. जो कोणी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा कोणत्याही अन्य ठिकाणी लोकांच्या देखत भारतीय राष्ट्रध्वज किंवा भारताचे संविधान किंवा त्याचा कोणताही भाग जाळील, छिन्नविच्छिन्न करील, विरूप करील, त्याचे पावित्र्य विटाळील, तो विद्रूप करील, नष्ट करील, पायांखाली तुडवील किंवा अन्यथा त्याची बेअदबी करील (मग ती तोंडी किंवा लेखी शब्दांद्वारे असो वा कृतीद्वारे असो) त्याला, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण १.**—कायदेशीर मार्गाने भारताच्या संविधानात विशोधन किंवा भारतीय राष्ट्रध्वजात बदल घडवून आणण्याच्या हेतूने, संविधानाबाबत किंवा भारतीय राष्ट्रध्वजाबाबत किंवा शासनाच्या कोणत्याही उपाययोजनांबाबत नापसंती दर्शविणारे अभिप्राय व्यक्त करण्याने किंवा त्यांवर टीकाटिप्पणी करण्याने या कलमान्वये कोणताही अपराध घडणार नाही.

**स्पष्टीकरण २.**—"भारतीय राष्ट्रध्वज" या शब्दप्रयोगात, कोणत्याही पदार्थापासून तयार केलेले किंवा कोणत्याही पदार्थावर चितारलेले भारतीय राष्ट्रध्वजाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे अगर भागांचे चित्र, रंगीत चित्र, रेखाटन किंवा छायाचित्र, अथवा अन्य दृश्य प्रतिरूपण अंतर्भूत आहे.

**स्पष्टीकरण ३.**—"सार्वजनिक ठिकाण" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जनतेने वापरावी म्हणून योजलेली किंवा जेथे त्यांना प्रवेश असेल अशी कोणतीही जागा असा आहे, व त्यात कोणत्याही सार्वजनिक वाहनाचा अंतर्भाव आहे.

**भारतीय राष्ट्रगीत गाणे, इत्यादींस प्रतिबंध.**

३. जो कोणीही भारतीय राष्ट्रगीत गाण्यास हेतुपुरस्सर प्रतिबंध करील किंवा असे राष्ट्रगीत गात असलेल्या जनसमूहास व्यत्यय आणील, त्याला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## THE PREVENTION OF INSULTS TO NATIONAL HONOUR ACT, 1971

## राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| bring into contempt | बेअदबी करणे | [S. 2] |
| deface | विरूप करणे | [S. 2] |
| defile | पावित्र्य विटाळणे | [S. 2] |
| disapprobation | नापसंती | [S. 2-expl. 1] |
| disfigure | विद्रूप करणे | [S. 2] |
| Indian National Flag | भारतीय राष्ट्रध्वज | [S. 2-expl. 2] |
| insults to national honour | राष्ट्र प्रतिष्ठेचा अपमान | [Long title] |
| public conveyance | सार्वजनिक वाहन | [S. 2-expl. 3] |
| public place | सार्वजनिक ठिकाण | [S. 2-expl. 3] |
| visible representation | दृश्य प्रतिरूपण | [S. 2-expl. 2] |

## राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१

## THE PREVENTION OF INSULTS TO NATIONAL HONOUR ACT, 1971

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| दृश्य प्रतिरूपण | visible representation | [S. 2-expl. 2] |
| नापसंती | disapprobation | [S. 2-expl. 1] |
| पावित्र्य विटाळणे | defile | [S. 2] |
| बेअदबी करणे | bring into contempt | [S. 2] |
| भारतीय राष्ट्रध्वज | Indian National Flag | [S. 2-expl. 2] |
| राष्ट्र प्रतिष्ठेचा अपमान | insults to national honour | [Long title] |
| विद्रूप करणे | disfigure | [S. 2] |
| विरूप करणे | deface | [S. 2] |
| सार्वजनिक ठिकाण | public place | [S. 2-expl. 3] |
| सार्वजनिक वाहन | public conveyance | [S. 2-expl. 3] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई